11-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 10-05-2025 23:20 Page 1



गोवा किनारपट्टी क्षमतेचा एनआयओकडून नवा अभ्यास पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



'आयपीएल २०२५'चे पुढचे सामने कुठे होणार! पान ४ वर

वेर्णा, रविवार, ११ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 248 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 11 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### केरळात २७ मे रोजी पाऊस पोहोचणार

**नवी दिल्ली, दि. १०** : नैऋत्य मान्सून देशात नियोजित वेळेपेक्षा ४ दिवस आधी पोहोचण्याची अपेक्षा आहे. भारतीय हवामान खात्याने अंदाज वर्तवला आहे की तो २७ मे रोजी केरळच्या किनाऱ्यावर पोहोचेल. साधारणपणे मान्सून १ जून रोजी येतो. हवामान खात्याच्या मते, ८ जुलैपर्यंत मान्सून संपूर्ण देश व्यापेल. जर मान्सून २७ मे रोजी आला तर २००९ नंतर पहिल्यांदाच तो केरळमध्ये इतक्या लवकर पोहोचेल. २००९ मध्ये मान्सून २३ मे रोजी केरळमध्ये पोहोचला होता. पुढील आठवड्यापर्यंत अंदमान आणि निकोबारमध्ये मान्सूनचा पाऊस सुरू होऊ शकतो. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, १३ मे पर्यंत मान्सून अंदमान आणि निकोबारच्या काही भागात दाखल होण्याची शक्यता आहे. देशातील एकूण पावसापैकी ७०% पाऊस मान्सून हंगामात पडतो. देशातील ७०% ते ८०% शेतकरी पिकांच्या सिंचनासाठी पावसावर अवलंबून आहेत.

---

### चारधाम यात्रेसाठी हेलिकॉप्टर सेवा बंद

**डेहराडून, दि. १०** : भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, यात्रेदरम्यान हेलिकॉप्टर सेवा बंद करण्यात आल्या आहेत. पुढील आदेश येईपर्यंत ही बंदी सुरू राहील. ज्या प्रवाशांसाठी हेलिकॉप्टर बुकिंग करण्यात आले होते. त्या रद्दही केल्या जात आहेत. यूपीसीए (उत्तराखंड नागरी विमान वाहतूक विकास प्राधिकरण) नुसार, चार धाम यात्रा हेलिकॉप्टर सेवा तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आली आहे. हेलिकॉप्टर सेवा फक्त चार धाम यात्रा स्थळांवरून यात्रेकरूंना बाहेर काढण्यासाठी उपलब्ध आहे. वास्तविक, केदारनाथ धामसाठी गुप्त काशी, सिरसी आणि फाटा येथील भाविकांना हेलिकॉप्टर सेवा दिली जाते.

---

### राणाच्या कोठडीत ६जूनपर्यंत वाढ

**मुंबई, दि. १०** : मुंबईतील २६/११ हल्ल्याचा कथित मास्टरमाइंड दहशतवादी तहव्वुर राणाला आज (दि.९) पटियाला हाउस न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला ६ जून २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. राणाला अलीकडेच अमेरिकेहून प्रत्यर्पित करून भारतात आणण्यात आले आहे. न्यायालयाने आपल्या आदेशात राष्ट्रीय तपास संस्थेला निर्देश दिले आहेत की, राणाची प्रत्येक २४ तासांनी वैद्यकीय तपासणी करण्यात यावी आणि त्याला प्रत्येक दुसऱ्या दिवशी वकिलाशी भेटण्याची परवानगी दिली जावी. राणाला एनआयएच्या मुख्यालयातील उच्च सुरक्षा सेलमध्ये ठेवण्यात आले आहे, जिथे २४ तास सीसीटीव्ही आणि सुरक्षा रक्षकांची निगराणी असते.

एनआयएच्या चौकशीत तहव्वुर राणाला पाकिस्तानातील त्याचे हँडलर, निधीचा स्रोत आणि संभाव्य स्लीपर सेल नेटवर्कबद्दल प्रश्न विचारले जात आहेत.

---

### श्रीलंकेत हेलिकॉप्टर कोसळून ६ ठार

कोलंबो, दि. १० : श्रीलंकेत शुक्रवारी एक लष्करी हेलिकॉप्टर जलाशयात कोसळून मोठी दुर्घटना घडली. यात ६ जणांचा मृत्यू झाला. तर ६ जण जखमी झाले. या हेलिकॉप्टरमधून १२ जण प्रवास करत होते. त्यातील ६ जणांचा मृत्यू झाला असून उर्वरित ६ जण वाचले आहेत. मृतांमध्ये चार कमांडो आणि हवाई दलातील दोघा जवानांचा समावेश आहे. हे हेलिकॉप्टर कोलंबोपासून सुमारे २८० किलोमीटर ईशान्येला असलेल्या मडुरू ओया येथील एका जलाशयात कोसळले.

# तोंडावर शांतता, पाठीमागून वार! युद्धविरामानंतर पाकचे ड्रोन हल्ले

## भारताच्या संरक्षण दलांच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक | नागरिकांमध्ये पुन्हा भीतीचे वातावरण

*नवी दिल्ली, दि. १० :*

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीवर विश्वास ठेवून भारताने पाकिस्तानशी केलेली शस्त्रसंधी भारताच्या चांगलीच अंगलट आली आहे. भारत – पाकिस्तान युद्धविरामाच्या भारताच्या घोषणेनंतर अवघ्या तीन तासातच पाकिस्तानने श्रीनगरमध्ये ड्रोन हल्ले करून युद्धविरामाचे उल्लंघन केले आहे. खुद्द जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनीच शनिवारी रात्री ८ वा . ५३ मि. ट्वीट करीत ही माहिती दिली आहे. दरम्यान पाकिस्तानने युद्धविरामाचं उल्लंघन केल्यानंतर भारताच्या संरक्षण दलांच्या अधिकाऱ्यांनी तातडीची बैठक बोलावली आणि परिस्थितीचा आढावा घेतला.**



अमेरिकेच्या दबावाखाली आणि आंतरराष्ट्रीय राजनैतिक हालचालींनंतर, अण्वस्त्रसज्ज भारत आणि पाकिस्तान या दोन शेजारी देशांनी शनिवारी युद्धविराम जाहीर केला. गेल्या काही दिवसांपासून वाढत असलेल्या संघर्षाला आळा बसावा, या उद्देशाने दोन्ही देशांनी ही सहमती दर्शवली.

मात्र, युद्धविरामाच्या घोषणेनंतर अवघ्या काही तासांतच जम्मू आणि काश्मीरमधून संघर्षविरामाचे उल्लंघन झाल्याचे वृत्त समोर आले. श्रीनगर आणि जम्मूमधील नागरिकांनी स्फोटांचे आवाज ऐकले, तर रात्रीच्या वेळी आकाशात उजेड व स्फोटांची दृश्ये दिसल्याचे स्थानिक अधिकाऱ्यांनी माध्यमांना सांगितले. काश्मीर खोऱ्यात मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या चकमकींमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर युद्धविरामाचे उल्लंघन झाल्याने नागरिकांमध्ये पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.आतापर्यंत या उल्लंघनाबाबत अधिकृत निवेदन देण्यात आलेले नसले तरी दोन्ही देशांच्या नात्यांमध्ये पुन्हा तणाव निर्माण होण्याची चिन्हे आहेत. आंतरराष्ट्रीय समुदायाने या घडामोडींकडे लक्ष वेधले असून, युद्धविरामाचा खराखुरा अंमल होणार की नाही, हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान भारत – पाकिस्तान सीमेवरील तणाव निवळवण्याच्या दृष्टीने दोन्ही देशांनी तात्काळ आणि सर्वसमावेशक युद्धबंदी अंमलात आणण्यावर शनिवारी सहमती दर्शवली. ही युद्धबंदी भारतीय प्रमाणवेळेनुसार शनिवारी संध्याकाळी ५ वाजल्यापासून लागू झाली. जमिनीद्वारे, आकाशातून आणि समुद्रामार्गे होणारी कोणतीही गोळीबाराची अथवा लष्करी कारवाई पूर्णपणे थांबवली गेल्याचे दोन्ही देशांकडून जाहीर करण्यात आले . मात्र त्यानंतर अवघ्या तीन तासात पाकिस्तानने पलटी मारत श्रीनगर मध्ये ड्रोन हल्ले केले आहेत .युद्धविरामाच्या घोषणेवेळी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दिलेल्या संक्षिप्त निवेदनात सांगितले होते की, पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी दुपारी ३ वा. ३५ मि. ला भारतीय डीजीएमओना दूरध्वनी केला. दोन्ही बाजूंनी संध्याकाळी ५ पासून युद्धबंदी अंमलात आणण्यावर एकमत झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पान २ ▶

### युद्धविरामानंतर कर्नल सोफिया कुरेशी यांनी केलेले निवेदन

- पाकिस्तानने दावा केला की त्यांच्या जीएफ –१७ च्या माध्यमातून एस – ४०० आणि ब्राम्होस क्षेपणास्त्रांचे नुकसान केले. ते साफ खोटे आहे. त्यांच्या दाव्यानुसार भारतातील एअरफिल्ड्स जसं की सिरसा, जम्मू, पठाणकोट, भठिंडा, नलिया आणि भूज इथे आहेत. ही माहिती पण चुकीची आहे.
- पाकिस्तानने म्हटले की भारताचा चंदिगड आणि बियास येथील तोफखाना नष्ट झाला. हे पण खोटे आहे. तिथल्या सगळ्या गोष्टी सुरक्षित आहेत.
- पाकिस्तानकडून आणखी एक खोटा आरोप केला जातोय की भारतीय सेनेने मशिदींचे नुकसान केले. पण मी स्पष्टपणे सांगते की भारत हे एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. भारतीय सैन्य हे संवैधानिक मूल्यांना जपते.
- भारतीय सेनेने पाकिस्तानी लष्कराचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. यामध्ये जमिनीवरील आणि हवेतील सामुग्रींचा समावेश आहे.
- याशिवाय भारताने पाकिस्तानच्या एअरफिल्डचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. पाकिस्तानची संरक्षण प्रणाली, रडार सिस्टिम यांना नुकसान पोहोचवले. लाइन ऑफ कंट्रोलजवळील कमांड अँड कंट्रोल, मिलिटरीच्या पायाभूत सुविधा आणि पाकिस्तानी सैन्याचे एवढे नुकसान केले की त्यांची लढण्याची क्षमता नष्ट झाली.
- भारताच्या अखंड सुरक्षेसाठी भारतीय सैन्य पूर्णपणे तयार आहे, असेही कुरेशी यांनी पत्रकार परिषदेत ठामपणे सांगितले.

# कुळे येथे तिघांवर हल्ला; स्थानिकांचा पोलिस ठाण्यावर मोर्चा

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. १०** : : किरकोळ कारणावरून कुळे येथील तीन युवकांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी सर्व आरोपींची चौकशी करण्यात पोलिस अपयशी ठरत असल्याने संतप्त स्थानिकांनी शनिवारी संध्याकाळी उशीरा कुळे पोलिस ठाण्याबाहेर मोठ्या संख्येने मोर्चा काढत तीव्र निषेध नोंदवला.

या प्रकरणातील सर्व आठ आरोपींविरोधात कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करत नागरिकांनी कुळे पोलिस निरीक्षक राघोबा कामत यांच्याशी चर्चा केली. विशेषतः मोले येथील एका आरोपीसह फोंडा येथील सात जणांचीही सखोल चौकशी करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

चार दिवसांपूर्वी घडलेल्या या घटनेनंतर अद्याप फक्त एका आरोपीची चौकशी करण्यात आली असून उर्वरित सात आरोपी अद्याप पोलिसांच्या तपासाच्या कक्षेबाहेर असल्याने स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. चौकशी सुरू असून संबंधित आरोपींना नोटीस बजावण्यात आल्या आहेत, नागरिकांनी घाबरू नये, असे स्पष्टीकरण पीआय रागोबा कामत यांनी दिले.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, चार दिवसांपूर्वी कुळेमधील तीन युवक दुचाकीवरून प्रवास करत असताना, फोंडा येथील सात जणांची कार मोलेच्या दिशेने जात होती. या दरम्यान कारचा साइड मिरर दुचाकीला धडकला. यानंतर दुचाकीस्वारांनी कार चालकाला शांतपणे वाहन चालवण्याचा सल्ला दिला. मात्र या सूचनेवर चिडून, कारमधील सात जणांनी तरुणांचा पाठलाग केला व त्यांच्यावर हल्ला करत त्यांना जखमी केले. हल्ल्यात मोले येथील एक स्थानिक युवकही सहभागी झाला होता.

हल्ल्यानंतर संबंधित युवकांच्या पालकांनी पोलिसांकडे तक्रारी दाखल केल्या. मात्र चौकशीत होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिक संतप्त झाले असून, जोपर्यंत डीवायएसपी कुळे पोलिस ठाण्याला भेट देत नाहीत, तोपर्यंत आम्ही येथेच ठिय्या देऊन बसणार, असा इशारा उपस्थित स्थानिकांनी दिला. त्यानंतर पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या चौकशीच्या आश्वासनानंतर परिस्थिती निवळली

# पर्रा येथे १.६५ कोटींचे ड्रग्ज जप्त; नायजेरियन अटकेत

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १०** : गोवा गुन्हे शाखेने शुक्रवारी रात्री मोठी कारवाई करत पर्रा येथील अराडी भागात भाड्याने घेतलेल्या खोलीवर छापा टाकून २३ वर्षीय नायजेरियन नागरिक ननायेलुगो अबासिली याला अटक केली. या कारवाईत तब्बल १.६५ कोटी रुपये किमतीचे विविध अंमली पदार्थ आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली.

गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अबासिलीकडून २,४०० एक्स्टसी टॅब्लेट (एकूण वजन १.१२३ किलोग्रॅम), ६० ग्रॅम कोकेन, ९९ ग्रॅम ब्राउन शुगर, १९ ग्रॅम क्रिस्टल एमडीएमए आणि ७०,००० रुपये रोख जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या साहित्याची एकूण बाजारमूल्ये १,कोटी ६४ लाख ९४ हजार ५० रुपये इतकी आहे.

अबासिली २८ एप्रिल २०२५ पासून गोव्यात विद्यार्थी व्हिसावर वास्तव्यास होता. तेलंगणा अंमली पदार्थ विरोधी विभागाकडून मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर गुन्हे शाखेने ही कारवाई केली. तेलंगणा अँटी–नार्कोटिक ब्युरोकडून मिळालेल्या सूचनेवरून तपास सुरू करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक तुषार लोटलीकर व लक्ष्मी आमोणकर यांच्या नेतृत्वाखाली आठवडाभर चाललेल्या गुप्त देखरेखीनंतर ही यशस्वी कारवाई पार पडली, अशी माहिती गुन्हे शाखेचे पोलिस अधीक्षक (एसपी) राहुल गुप्ता (आयपीएस) यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही कारवाई पीआय हिरू कवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. त्यांच्या पथकात महिला पीएसआय प्रगती मलिक, एएसआय श्रीराम साळगावकर आणि पोलीस शिपाई संदेश कांबळी, स्वप्नील सिमेपुरुषकर आणि पुंडलिक नावेलकर यांचा समावेश होता. अबासिलीविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदा अंतर्गत कलम २१(ब) आणि २२(क) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास डीवायएसपी राजेश कुमार व एसपी राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय हिरू कवळेकर करीत आहेत. एसपी राहुल गुप्ता यांनी सांगितले की, गोवा पोलिसांनी यावर्षी अंमली पदार्थ तस्करीविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, २०२५ च्या पहिल्या साडेचार महिन्यांत ६८.३६ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. यामध्ये ७४ संशयितांना अटक करण्यात आली असून, फक्त गुन्हे शाखेनेच ५७ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करत १५ जणांना अटक केली आहे. यामध्ये भारतात कार्यरत असलेल्या दोन आंतरराष्ट्रीय रॅकेटचा भांडाफोड करण्यात आला आहे. गुप्ता यांनी जनतेला आणि घरमालकांना आवाहन केले की, परिसरात कुठल्याही संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने पोलिसांना कळवावे. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# हॉटेल्स, कार्यक्रम आणि रेस्टॉरंट व्यवसाय मंदावले

## भारत-पाकिस्तान तणावाचा गोव्याच्या पर्यटनावर परिणाम | हॉटेल्स बुकिंगमध्ये लक्षणीय घट

**कार्स्टन मिरांडा**
*■ टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १०** : भारत आणि पाकिस्तानमधील सध्याच्या युद्धजन्य तणावाच्या पार्श्वभूमीवर गोव्यातील पर्यटन उद्योगाला मोठा फटका बसत असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील प्रमुख भागधारकांनी याबाबत चिंता व्यक्त केली असून, हॉटेल बुकिंग, कॉर्पोरेट कार्यक्रम तसेच रेस्टॉरंट व्यवसायात लक्षणीय घट झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

पर्यटन हंगाम सामान्यतः मे महिन्यात संपतो. मात्र, यंदा हंगाम संपण्याच्या आधीच मंदीची छाया गडद झाल्याचे उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी सांगितले. अनेक हॉटेल्सनी गट आरक्षण रद्द झाल्याच्या तक्रारी केल्या आहेत. सध्याच्या तणावपूर्ण वातावरणाचा गोव्यातील हॉटेल बुकिंगवर थेट परिणाम झाला आहे. विशेषतः मोठ्या गटांच्या बुकिंगमध्ये रद्द करणाऱ्यांची संख्या वाढली आहे, अशी माहिती एका ज्येष्ठ हॉटेल व्यावसायिकाने दिली.त्यांनी पुढे सांगितले की, मे महिन्यात ऑक्युपन्सी ५० टक्क्यांच्या खाली घसरली असून, जून महिन्यातही फारशी सुधारणा होण्याची चिन्हे नाहीत. गेल्या काही वर्षांतील ही सर्वात खालावलेली तिमाही ठरू शकते.

या स्थितीवर प्रतिक्रिया देताना ट्रॅव्हल अँड टुरिझम असोसिएशन ऑफ गोवा (टीटीएजी ) चे अध्यक्ष जॅक सुखीजा यांनी सांगितले की , सध्याची अस्थिर परिस्थिती लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर बुकिंग रद्द होत आहेत. हे अशा संघर्षकाळात अपेक्षितच असते. मात्र, लवकरच स्थिती पूर्वपदावर येईल, अशी आशा आहे. एका कार्यक्रम व्यवस्थापन संस्थेच्या प्रतिनिधीने माहिती दिली की, उत्तर भारतातील विमानतळांवरील उशीर आणि अडचणींमुळे गोव्यातील जवळपास सर्व कॉर्पोरेट आणि पर्यटकांकडून बुक झालेले कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. हे कार्यक्रम खासगी संस्था आणि पर्यटकांकडून नियोजित होते; राज्य किंवा केंद्र सरकारशी यांचा काही संबंध नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.



हॉटेल उद्योगासोबतच राज्यातील रेस्टॉरंट मालकांनीही व्यवसायात घट झाल्याचे मान्य केले आहे. या महिन्यात व्यवसाय २०–२५ टक्क्यांनी घटला आहे. स्थानिक ग्राहक येतात, मात्र पर्यटकांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे, असे दक्षिण गोव्यातील एका रेस्टॉरंट मालकाने सांगितले. पणजीमधील एका रेस्टॉरंट व्यावसायिकाने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित केला. स्थानिक नागरिकही सध्या घराबाहेर पडण्यास टाळाटाळ करत आहेत. संपूर्ण युद्धजन्य मानसिकतेचा त्यांच्यावर परिणाम होत आहे, असे ते म्हणाले.

केवळ गोव्यातील पर्यटनच नव्हे, तर गोव्यातील नागरिकांच्या राज्याबाहेरील सहलीही या अस्थिरतेमुळे रद्द होत असल्याचे ट्रॅव्हल एजंटनी सांगितले. उत्तर भारतातील काही विमानतळांवरील अडचणीमुळे गोवेकर अडकले असून त्यांचे परतणे कठीण झाले आहे. त्यामुळे अनेकांनी सहली पुढे ढकलल्या आहेत, असे एका स्थानिक ट्रॅव्हल एजंटने स्पष्ट केले.

सध्याची स्थिती २६/११ च्या घटनेनंतर आलेल्या मंदीप्रमाणेच आहे. बुकिंग रद्द करणाऱ्यांची लाट पुन्हा अनुभवत आहोत, असे एका उद्योग तज्ज्ञाने सांगितले. त्यांनी असेही नमूद केले की, आर्थिक अस्थिरता, भारत–पाक संघर्ष आणि कॉर्पोरेट खर्चांवरील कपात यामुळे गोव्यातील पर्यटन उद्योग सध्या प्रचंड दबावाखाली आहे.

पंचतारांकित रिसॉर्ट रिओने गोवा टुरिझम, टीटीएजी, एचआरडब्ल्यूआय आणि पर्यटन मंत्रालयासह इतर भागधारकांना सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. प्रादेशिक तणावाचा आंतरराष्ट्रीय प्रवाशांच्या मानसिकतेवर परिणाम होत असून, गोव्याचे पर्यटन क्षेत्रही यापासून वाचलेले नाही, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सध्याच्या तणावाच्या जोडीने पायाभूत सुविधांची कमतरता, सेवा गुणवत्तेतील असमाधान, स्पर्धात्मक किंमती यांसारखी दीर्घकालीन आव्हानेही गोव्याच्या पर्यटन क्षेत्रासमोर आहेत. टीटीएजी अध्यक्ष सुखिजा यांनी सांगितले की, आपल्याला वाहतूक व्यवस्थापन, स्वच्छता, प्लास्टिकविरोधी उपाययोजना आणि दलाली रोखण्यावर भर द्यावा लागेल.

सध्याच्या दबावात असूनही, उद्योग क्षेत्रातील विक्री पथके बुकिंग वाचविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सध्याची अस्थिरता काळजीचा विषय असला तरी राष्ट्रीय सुरक्षेचे प्रश्न प्राथमिक आहेत. मात्र, परिस्थिती स्थिर झाल्यावर पर्यटन क्षेत्र पुन्हा उभारी घेईल, असा विश्वास पर्यटन व्यावसायिकांनी व्यक्त केला आहे.